महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : एनओटी-३६१७/प्र.क्र.५३६/२०२४/जाहिरात** दिनांक : १७ एप्रिल , २०२५

## - : शुद्धिपत्रक :-

**विषय :- राज्य सेवा मुख्य परीक्षा – २०२४, अधिसूचना क्रमांक ०१३/२०२५, परीक्षेच्या आयोजनाबाबत.**

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ मधील राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२४ करीता दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी निकाल प्रसिद्ध करण्यात आला होता. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालातून पात्र ठरलेल्या काही EWS अथवा OPEN मधून SEBC अथवा OBC विकल्प निवडलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेचा अर्ज करताना त्यांच्या अर्जामध्ये सुधारित विकल्प दिसून न आल्याने यासंदर्भात उमेदवारांकडून निवेदने प्राप्त झाली होती. प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

(१) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता परीक्षेपूर्वी दिनांक २४ जुलै, २०२४ रोजीच्या शुद्धिपत्रकाद्वारे आयोगातर्फे Link उपलब्ध करून देण्यात आली होती . त्यावेळी सदर शुद्धिपत्रकानुसार एसईबीसी अथवा इ.मा.व. प्रवर्गातील विकल्प दिलेल्या उमेदवारांकडून NCL – “Yes” किंवा "No" असा दावा करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा विकल्प दिलेल्या बऱ्याच उमेदवारांनी NCL संदर्भात “Yes” किंवा "No" असा कोणताही दावा केलेला नसल्याने , अशा उमेदवारांचा मूळ अर्जातील दावा कायम राहिला.

(२) प्रस्तुत प्रकरणी उमेदवारांकडून प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता ज्या अराखीव अथवा आ.दु.घ. वर्गवारीतील उमेदवारांनी एसईबीसी अथवा इ.मा.व. असा विकल्पाचा दावा केला आहे, परंतु NCL बाबत कोणताही दावा केला नाही, अशा उमेदवारांना त्यांनी यापूर्वी आयोगाच्या शुद्धिपत्रकास अनुसरून दिलेल्या विकल्पाच्या दाव्यानुसार त्यांचा एसईबीसी अथवा इ.मा.व. वर्गवारीचा पूर्व व मुख्य परीक्षेसाठी दावा त्यांचे NCL प्रमाणपत्र मुलाखतीच्या टप्प्यावर तपासण्याच्या अटींच्या अधीन राहून ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला व यासंदर्भात दिनांक २९ मार्च, २०२५ रोजी शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले. तसेच या निर्णयामुळे दिनांक १२ मार्च, २०२५ रोजीच्या निकालामध्ये सुधारणा करून सुधारित निकाल दिनांक २९ मार्च, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. सुधारित निकालाप्रमाणे नव्याने पात्र ठरलेल्या आ.दु.घ. वर्गवारीतील ३१८ उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरले.

२. राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२४ च्या सुधारित निकालानुसार नव्याने पात्र ठरलेल्या या ३१८ उमेदवारांना राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ च्या पूर्वतयारीसाठी पुरेसा अवधी मिळाला नसल्यामुळे दिनांक २६ ते २८ एप्रिल, २०२५ या कालावधीत नियोजित मुख्य परीक्षा पुढे ढकलण्याबाबत उमेदवारांकडून आयोगास निवेदने प्राप्त झाली आहेत. उमेदवारांकडून प्राप्त निवेदने तसेच इतर सर्व बाबींचा साकल्याने विचार करून प्रस्तुत राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ सुधारित वेळापत्रकानुसार **दिनांक २७, २८ व २९ मे, २०२५** या कालावधीत घेण्यात येईल. आरक्षणाच्या अनुषंगाने उद्भवलेल्या असाधारण परिस्थितीचा विचार करून परीक्षेच्या वेळापत्रकातील प्रस्तुत बदल हा एकवेळची अपवादात्मक बाब म्हणून आयोगाकडून सदर निर्णय घेण्यात आला आहे.

३. विषयांकित परीक्षेसाठी दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी प्रसिद्ध अधिसूचना तसेच दिनांक २९ मार्च, २०२५आणि ०४ एप्रिल, २०२५ रोजी प्रसिद्ध शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग